CMYK

सुविचार

आत्मविश्वासाने मनोबल वाढते
आणि निर्णय घेणे सोपे होते.

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



६२० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेच्या स्वच्छतेची धुरा एका दिव्यांग परिचरावर

पेज 4

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 159 ■ रविवार,दि. 20 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# १५ लाख वृक्ष लागवड:धाराशिवकरांनी करून दाखवलं, आशिया बुक आणि इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

## नोंद होणारा महाराष्ट्रातला पहिला जिल्हा, नंदनवन होण्यासाठी प्रयत्न करा, पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांचे आवाहन



**आरंभ मराठी | धाराशिव**

व्यापक जनजागृती, पर्यावरणप्रेमींचा उत्सफूर्त सहभाग जिल्हा प्रशासनाचे नियोजन, यामुळे हरित धाराशिव अभियान यशस्वी झाले आणि एकाच दिवसात तब्बल १५ लाख वृक्षलागवड करून जिल्ह्याने उच्चांक करून दाखवला. या पर्यावरणाच्या चळवळीची इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्ड व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड या दोन्हीमध्ये नोंद झाली आहे. धाराशिव जिल्ह्यासाठी हा दिवस अभिमानाचा,गौरवाचा ठरला आहे. दरम्यान,या उपक्रमाबद्दल पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचा सत्कार करत कौतुक केले.

हरित धाराशिव अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील २३४ ग्रामपंचायती, नगरपालिका व नगर पंचायतीच्या शहरात १५ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली. धाराशिवच्या शिंगोली शिवारात वन विभागाच्या पाच हेक्टर क्षेत्रावर एक पेड माँ के नाम,जिल्हा प्रशासन आणि उत्स्फूर्त लोकसहभागातून हरित धाराशिव अभियान १५ लक्ष वृक्ष लागवडीचा शुभारंभ पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आला.यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील,आमदार कैलास घाडगे-पाटील,सिने अभिनेते स्वप्नील जोशी,माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना,छत्रपती संभाजीनगरचे वनसंरक्षक प्रमोदचंद लाखरा,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, सामाजिकवनीकरण विभागाचे विभागीय अधिकारी वन व्ही.के.करे,प्रादेशिक विभागीय वन अधिकारी बी.ए.पोळ आदीची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना पालकमंत्री सरनाईक म्हणाले, धाराशिव जिल्ह्याचे वनराई क्षेत्र करण्यासाठी अपेक्षित असेल तेवढा निधी उभारू व हा प्रकल्प यशस्वीपणे साकारून तसेच शिंगोली येथील वनराईसाठी बारा मीटरचा रस्ता करावा अशा सूचना देत ते म्हणाले की,जिल्ह्यातील वनक्षेत्र वाढवून ते विकसित करण्यासाठी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला तरी तो करु. यावेळी आमदार कैलास पाटील यांनी शेत रस्त्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर पालकमंत्री म्हणाले की,त्यांच्या सुचनेचा निश्चितपणे जिल्हाधिकाऱ्यांनी विचार करून म ोजणीच्या बाबतीत जिल्हा प्रशासनाने योग्य तोडगा काढून शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दरम्यान,या अभियानाची नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र एजन्सीचे संजय भोला यांनी दिले. ती दोन्ही प्रमाणपत्र व मेडल्सने पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी पुजार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष यांना सन्मानित करण्यात आले.



### आमदार कैलास पाटील म्हणाले, झाडे लावणे अवघड नाही, जगविणे अवघड,संवर्धन आवश्यक



यावेळी आमदार कैलास पाटील म्हणाले, झाडे लावणे अवघड नाही ती जगविणे अवघड आहे. झाडे किती जगतात ते महत्त्वाचे आहे. लोकांनी आपली जबाबदारी म्हणून वृक्ष संवर्धन करण्यासाठी झोकून दिले पाहिजे. शेत रस्त्यासाठी महसूलचा आदेश असला तरी रस्ता देण्यासाठी जमीन मोजणीची अडचण येत आहे. त्यामुळे भूमी अभिलेख आठ अधिकारीपैकी सहा पदे रिक्त आहेत ती भरावीत, शेत रस्त्याची जमीन मोजून देण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

### येडशी अभयारण्यासाठी जिप्सी सुरू करणार

**आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची माहिती**



आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, आज आपण वृक्ष लागवडीचा जिल्ह्यामध्ये विक्रम घडवित आहोत.ही झाडे आपल्याला लावून चालणार नाही तर ती जगविण्यासाठी लोकप्रतिनिधी व सर्व नागरिकांनी प्रयत्न करावेत. एका व्यापक अभियानाचा भाग म्हणून आपण काम करीत आहोत. विशेष म्हणजे झाडे जगविणे ही सर्वांची जबाबदारी ही आपल्या कृतीम धून दाखवून द्यावी असे त्यांनी नमूद केले. शिंगोली,घाटंग्री शिवारात ३०० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात येणार आहे.तसेच येडशी अभयारण्य परिसरात जिप्सी सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी अडवणूक: मराठा तरुणांचा पालकमंत्र्यांना घेराव



**आरंभ मराठी | धाराशिव**

मराठा समाजाला दिली जाणारी कुणबी प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र जाणूनबुजून दिली जात नसल्याचा आरोप करत धाराशिव येथील मराठा समाजाच्या तरुणांनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमोर आक्रोश करत त्यांना घेराव घातला. हरित धाराशिव अभियानासाठी धाराशिव दौऱ्यावर आलेले पालकमंत्री सरनाईक हे शिंगोली येथील कार्यक्रम संपल्यानंतर सर्किट हाऊसमध्ये जात असताना मराठा तरुणांनी मोठा राडा घातला. यावेळी पालकमंत्री सरनाईक यांनी तरुणांची बाजू शांतपणे ऐकून घेतली. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला शिंदे समितीच्या शिफारशीनंतर नोंदी पाहून कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यात देखील कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले जात होते. मात्र, मागील वर्षापासून मराठा समाजाला दिली जाणारी कुणबी प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्रे मुद्दाम दिली जात नसल्याचा आरोप मराठा समाजाच्या तरुणांनी केला होता. काही महिन्यांपूर्वी जात पडताळणी कार्यालयात देखील काही तरुणांनी ठिय्या मांडून या प्रश्नावर आंदोलन केले होते. मात्र, सतत आंदोलन करूनही न्याय मिळत नसल्याची तरुणांची भावना आहे. त्यामुळेच मराठा समाजाचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले होते. मराठा समाजाचे प्रश्न मुद्दाम सोडवले जात नाहीत असा आरोप यावेळी उपस्थित तरुणांनी सरनाईक यांच्यासमोर केला. सरनाईक यांनी तात्काळ सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ यांना फोन करून या प्रश्नाची माहिती दिली. त्यानंतर सामाजिक न्याय मंत्र्यांनी समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांना ताबडतोब सर्किट हाऊसवर जाण्याचे फर्मान सोडले. हा संपूर्ण गोंधळ जवळपास अर्धा तास सुरू होता. मराठा समाजाचे जवळपास ७०० प्रमाणपत्र कार्यालयात अडवून ठेवले असून त्यातील ४०० जणांनी योग्य ते पुरावे देऊनही त्यांना प्रमाणपत्र दिली जात नसल्याचे यावेळी पुरावे देऊन सांगण्यात आले. यावेळी पालकमंत्री सरनाईक यांनी जिल्हाधिकारी आणि समाजकल्याणचे सहायक आयुक्त यांना सोमवारी बैठक घेऊन हा प्रश्न तात्काळ सोडवण्याच्या सूचना दिल्या. सोमवारी बैठकीचे आश्वासन दिल्यानंतर मराठा समाजाच्या तरुणांनी पालकमंत्री सरनाईक यांची वाट मोकळी केली.

# पारगाव येथील पुलाजवळ भीषण अपघात, दोन ठार, दोघे गंभीर



**आरंभ मराठी | वाशी**

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पारगाव येथे भरधाव एसयुव्ही गाडीवरील चालकाचा ताबा सुटल्याने अपघात होऊन दोघेजण ठार तर दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी (दि.१९) मध्यरात्री घडली. अपघातग्रस्त कार छत्रपती संभाजी नगर येथील असून, ऋषिकेश औताडे, अजिंक्य लेंबे यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. अन्य दोन गंभीर जखमींवर बीड येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.अपघातातील चौघेजण एसयुव्ही ७०० या गाडीने बीडहून सोलापुरच्या दिशेने जात असताना पारगाव नजीकच्या महामार्गावरील वळण रस्त्याचा अंदाज न आल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटला व अपघात घडला. अपघाताची माहिती मिळताच पारगाव बिटचे हेड कॉन्स्टेबल राजू लाटे यांच्यासह सहकारी पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.

# तुळजापुरात १२ हजार वृक्षांची लागवड

**तुळजापूर**- हरित धाराशिव अभियानांतर्गत जिल्हात एक दिवसात १५ लाख वृक्षारोपण करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने हाती घेतला होता.यावेळी तुळजापूर नगर परिषद अंतर्गत तुळजापूर शहरातील अग्नीशामक मैदानात शहरातील सामाजिक संस्था, विविध संस्था,पक्ष संघटना,युवकांनी या वृक्षा रोपण अभियानामध्ये आपला सहभाग उत्सपूर्तपणे नोंदवला. तुळजापूर येथे हरित धाराशिव अभियान संकल्प वृक्षरोपणाचा साठी एका दिवसात १२ हजार झाडे लावण्यात आली आहेत.यावेळी महंत इच्छागिरी महाराज,योगी महंत मावजीनाथ महाराज,आमदार राणा जगजीतसिंह पाटील, विनोद गंगणे,मा.नगराध्यक्ष सचिन रोचकरी,मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे ,आनंद कंदले, सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते. तसेच शहरातील विविध पक्ष, संघटना,टाटा सामाजिक संस्था,तुळजा भवानी मंदीरातील अधिकारी,कर्मचारी तसेच सिक्युरिटी कंपनीचे सर्व कर्मचारी,नगर परिषद अधिकारी,कर्मचारी,न प शाळेचे सर्व शिक्षक कर्मचारी,बचत गटाच्या महीला शहरातील युवकांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# तुळजापूर ड्रग्सप्रकरणी अभिजीत अमृतरावला अटक

## २३ जणांना अटक, तिघांना मिळाला जामीन, १२ आरोपी अद्याप फरार

**आरंभ मराठी | तुळजापूर**

ड्रग्स प्रकरणात सेवन गटातील संशयित आरोपी अभिजीत अमृतराव याला पोलिसांनी सोलापूर येथील मंगळवेढा रोड परिसरातील सीएनएस हॉस्पिटल जवळून शुक्रवारी (दि.१८) रात्री अटक केली. शनिवारी त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात आत्तापर्यंत २३ जणांना अटक करण्यात आली असून १२ आरोपी अजून फरार आहेत. तर तिघांना जामीन मंजूर झाला आहे. ताम लवाडी येथील टोल नाक्यावर १४ फेब्रुवारी रोजी सर्वप्रथम हे ड्रग्स पकडण्यात आले होते. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात अधिक तपास करत एकूण ३८ संशयित आरोपी निष्पन्न केले आहेत. याम धीलच एक फरार सेवन गटातील संशयित आरोपी अभिजीत अमृतराव यास पोलिसांनी सोलापूर येथून अटक केली. तामलवाडी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अमृतराव यांना सोलापूर येथून शुक्रवारी रात्री अटक केली. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधीक्षक रितू खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख व सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या मदतीला खेडमध्ये अवतरले एआय तंत्रज्ञान

**आरंभ मराठी | तेर**

धाराशिवपासून अवघ्या १५ किलोमीटरवर असणाऱ्या खेड ग्राम पंचायतने गेल्या पाच वर्षांमध्ये अनेक उपक्रम राबवून वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आपली छाप सोडली आहे. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, अटल ग्राम समृद्ध स्पर्धा, वॉटर शेड अशा अनेक स्पर्धेमध्ये गावाने प्रथम क्रमांक पटकावून एक वेगळेपण सादर केले आहे. याच क्रमात त्यांनी आणखी एक आघाडी घेत एआय तंत्रज्ञानाची सर्वत्र चर्चा होत असताना खेड ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांसाठी शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी व उत्पन्नावरील खर्च कमी करण्याच्या हेतूने शेती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी फसलच्या माध्यमातून गावामध्ये एआय तंत्रज्ञानाचे वेदर स्टेशन तयार केले. तसेच गावातील २० शेतकऱ्यांना वैयक्तिक एआय माहिती तंत्रज्ञानाचे सेटअप बसवून संपूर्ण गाव एआय तंत्रज्ञानाच्या कार्यक्षेत्रात आणले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करण्यासाठी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी स्वतः गावाला भेट देऊन या एआय फसल तंत्रज्ञानाची माहिती घेतली. शेतकऱ्यांशी चर्चा केली व शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्याविषयी जाणून घेतले. तसेच प्रकाश गरड या शेतकऱ्यांच्या शेतात बसवलेल्या वेदर स्टेशनचे पूजन करून एआय च्या तंत्रज्ञान प्रणालीचा शुभारंभ केला. या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक व प्रयोगशील शेतकरी नितीन (भाऊ) गरड, दत्तात्रय टकले, श्रीकृष्ण माने, नानासाहेब गवाड, धर्मराज लोमटे, राजाभाऊ गव्हाणे, नामदेव गरड, प्रकाश गरड, बाळासाहेब गरड, जगदीश शिंदे, बालाजी यावलकर, सरपंच/सदस्य सुनिल गरड ,गणेश गवाड महादेव गवाड बंकट गरड व इतर ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

## मराठवाड्यातील पहिले स्टेशन खेडमध्ये; उत्पादन वाढीसाठी मदत





## उत्पादन वाढीसाठी होणार फायदा

अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाची चर्चा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट किंवा बारामती अशा ठिकाणी होत असताना खेड ग्रामपंचायतने हा उपक्रम राबवून धाराशीवसारख्या आवर्षण भागात शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीसाठी एक नवे प्रगतीचे दरवाजे उघडले आहेत. एआय तंत्रज्ञान शेतकऱ्यांना पिकासाठी लागणारे पाणी बचती बरोबरच पिकावर होणारा खर्च खत -औषधे यावरही बचत करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडणार आहे. हे तंत्रज्ञान ऊस उत्पादनामध्ये क्रांती घडवणारे असून, याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पन्नामध्ये ३० ते ४०% अधिकचा फायदा होणार आहे. तसेच महाराष्ट्र सरकार व कारखाने याबाबत चर्चा करताना दिसत आहेत. परंतु, ग्रामीण स्तरावर स्वतःहून पुढाकार घेऊन शेतीमध्ये व शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बदल करण्याचा प्रयत्न खेड ग्रामपंचायत करत आहे हे कौतुकास्पद आहे.

CMYK

# वर्तमानाला सोलून काढणारी विद्रोही कविता


**मराठी** भाषेला साठच्यावर बोली लाभल्या आहेत.या बोलीतील अपार शब्दभांडारामुळे मायमराठीला भाषिक श्रीमंती,समृद्धी प्राप्त झाली आहे.विदर्भ–खानदेश–कोकण आणि राज्याच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या मराठीभाषेची अनेक रुपे आढळतील,पण तिचा आंतरिक गाभा एकच आहे.जो वारकरी संतांनी,शाहिरांनी आपल्याला सांगून ठेवला आहे.तो म्हणजे प्रेम आणि करुणेचा.मराठी कवितेला परखडतेची,विद्रोहाची सुद्धा मोठी वैभवशाली परंपरा आहे.तुकोबांचे अभंग आणि जोतीबांचे अखंड म्हणजे कवितारुपी शब्दबाणच आहेत, जे आजच्या काळातदेखील प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी सक्षम मानले जातात.त्याच परंपरेची पाईक असणारी आंबेडकरी विचाराची कविता कवी खेमराज भोयर लिहित आले आहेत.'सालं अतीच झालं!' हा त्यांचा कवितासंग्रह त्याच लोकपरंपरेशी नातं सांगणारा आहे.यातील बहूतेक कविता मनुवादी थोतांडाच्या चिंधड्या उडवणाऱ्या आणि मुजोर वर्तमानकाळाला निर्दयपणे सोलून काढणाऱ्या आहेत.एकीकडे विषमतावादी व्यवस्थेवर तुटून पडतानाच दूसरीकडे वंचितांसाठी दया,करुणा भाकणारी कविता तितक्याच ताकदीने लिहिणे ही सोपी गोष्ट नाही.पण कवी भोयर यांनी लोकबोलीत सर्रास वापरले जाणारे शब्द आपल्या कवितांमध्ये जाणीवपूर्वक वापरुन या कवितांना लोकपरंपरेच्या मुळतत्वाशी जोडले आहे.त्या जोडताना प्रस्थापित साहित्यविश्वाच्या धारणांना अक्षरशः फाट्यावर मारले आहे.कवीला आपल्या थोर विद्रोही परंपरेचा सार्थ अभिमान आहे याची प्रचिती या कविता वाचताना येते.

प्रगतीशील म्हणवणारे महाराष्ट्र राज्य हे शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्यांसाठी सबंध देशात कुप्रसिद्ध आहे.त्याविषयासंबंधी

'आत्महत्या डॉट कॉम' या कवितेत कवी

लिहितो,'कागदी घोडे अन्

कॉम्पुटरचा जमाना आहे शेतकऱ्यांसाठी आत्महत्येचा कॉलम रोज रिकामा आहे' याचाच अर्थ असा की सत्ता किंवा प्रस्थापित व्यवस्थेला शेतकऱ्यांच्या समस्या संपाव्यात,संपवाव्यात असं मुळीच वाटत नाही,उलट कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच जाव्यात आणि आम्ही त्याच्या बातम्या वाचतच राहू! अशी ही वृत्ती आहे जी या कृषीप्रधान देशाच्या मूळावर उठणारीच आहे.कवीला शेतकऱ्यांची ही दयनीय स्थिती बघवत नाही.सरकारी उपाययोजना कुचकामी ठरत असताना कवी त्यावर उपहासाने लिहून जातो,'खेड्याकडे चला' म्हणणारं कोडंखूप दिवसांनंतर उलगडलं निदान आमचे जिवंत मुर्दे




गाडण्याची व्यवस्था झाली'शहराकडे की खेड्याकडे? अशा द्विधा मनःस्थितीत सापडलेल्या भारतीयांवर ही कविता नेमके भाष्य करुन जाते.महानगरांमध्ये आता मानवी मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठीसुद्धा जागा,जमीन कमी पडत चाललीय,त्यामुळे खेड्याकडे जा आणि तिकडेच मरा! असे आम्हांला सांगितले जात असल्याचे परखडपणे या कवितेत सुनावण्यात आले आहे.समाजातील सर्व स्तरांकडे कवीचे बारीक लक्ष आहे. कवी हा खऱ्याअर्थाने समाजाचा प्रबोधनकारच असतो,तो जी सामाजिक वैगुण्ये,त्रुटी बघतो,त्यावर कवितेतून नेमके बोट ठेवत असतो,लोकांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे कामच

त्याची कविता करीत असते.कवी भोयर यांना तर लोककला,शाहिरी,आंबेडकरी जलसा अशी दणदणीत परंपरा लाभली आहे.त्या परंपरेला अनुरुपच त्यांची लेखणी

तळपत राहिली आहे.हा कवितासंग्रहही त्याला अपवाद नाही.ही कविता स्वजनांना कडक भाषेत फटकावणारी जशी आहे तशीच ती अन्यायावर पँथरच्या भूमिकेतून तुटून

पडणारीदेखील आहे.या संग्रहातील कविता समाजाला आरसा दाखविणाऱ्या आहेत त्याचबरोबर संविधानद्रोही राजकीय मस्तवालपणाला खडसावणाऱ्या पण आहेत. खेमराज भोयर यांच्या कविता महाकवी वामनदादांचा कनवाळू वारसा सांगतानाच नामदेव ढसाळांचा विद्रोह सुद्धा तितक्याच प्रभावीपणे जपताना दिसतात.

अनेक कवितांमधून वर्तमानकालीन घटना,प्रसंगांचा संदर्भ ठळकपणे डोकावताना दिसतो.एका अर्थाने कवी हा आपल्या काळातला भाष्यकारच असतो.वर्तमान काळात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांवर कवितेमधून मांडून कवी काळाचे दस्तऐवजच जोडत असतो.या कविता संस्कृती आणि भाषाभिमानी मुखंडांना आणि त्यांच्या दंभखोरीला झिडकारणाऱ्या आहेत.भोयर यांनी तथागतांच्या 'बहूजन हिताय बहूजन सुखाय' या उपदेशाला अनुसरुनच आपले कवितालेखन केले आहे.




आयुष्य जगताना चहूबाजूंनी जीवघेण्या संघर्षाला सामोरे जाताना कवीच्या जीवनात कौटुंबिक जिव्हाळ्याचे,प्रेमाचे प्रसंग येणेही अपरिहार्य असते.असे प्रसंगदेखील अतिशय भावोत्कटपणे कवीने चितारले आहेत.मुलांवर संस्कार करताना असो किंवा प्रेमाची भाषा उच्चारताना असो कवीचे सामाजिक भान मात्र हरवत नाही, हीच तर आंबेडकरी विचारांची खरीखुरी ताकद होय. जाती अव्यवस्थेमुळे भारतीय समाजाची माती झाली,वाताहत झाली याची टोचणी कवीमनाला आहे.ती अत्यंत परखड भाषेत वाचकांपुढे येते.जात या कवितेतून प्रेम करतानासुद्धा जात कशी पाहिली आणि पाळली जाते याचे

वर्णन आले आहे.जे आजही आपल्या समाजातले कडवट वास्तव आहे.लोकशाहीची उजळ माथ्याने होत असलेली घोर विटंबना हा देखील कवीच्या चिंतेचा विषय आहे.संविधानवादी जनता जागी झाली पाहिजे,तिने अन्यायाविरुद्ध पेटून उठले पाहिजे आणि आपल्या भारतीय लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे ही कवीची आंतरिक तळमळ आहे जी या संग्रहातील कवितांमधून व्यक्त झाली आहे.प्रतिक्रांतीला बळ देणारे आपलेच लोक असतात,जे अधःपतीत असतात,वाट चुकलेले असतात,अशांना तसेच समोर उभ्या ठाकलेल्या

बलाढ्य शत्रूला पराभूत करायचे असेल तर तथागत बुद्धांनी

सांगितलेल्या सम्यक मार्गाशिवाय पर्याय नाही याचे पक्के भान कवीला आहे.म्हणूनच बुद्धांच्या जीवनाकडून काय प्रेरणा मिळते,काय प्रेरणा घेतली गेली जावी यावर लिहिताना भोयर 'बोलती बंद' या कवितेत लिहून जातात,'सिद्धार्था! तू नाकारलेस वैभव

अन् लोकशाहीचा पाया उभा राहिला तू चाललास चालतच राहिलास

अन् सत्याचा मार्ग शोधलास. विज्ञानाची बीजे रोवली गेली

अन् धर्म–पोंगापंडितांची बोलती बंद झाली.' या कवितासंग्रहाला ज्येष्ठ विचारवंत,कवीश्रेष्ठ डॉ.यशवंत मनोहर यांची दीर्घ आणि चिंतनशील प्रस्तावना लाभली आहे.'जळत्या वर्तमानाला देणारी कविता' असा भोयर यांच्या कवितेचा गौरव त्यांनी केला आहे.ही कविता समतेशी नातं जपणारी आणि क्रांतीचा ध्वज खांद्यावर पेलणारी असल्याचे प्रशस्तीपत्रच मनोहर सरांनी कवी खेमराज भोयर यांना दिले आहे.जो त्यांना आणि त्यांच्या क्रांतदर्शी कवितेचा गौरवच म्हणायला हवा.

'माझ्या मुला' या कवितेत एके ठिकाणी कवी

लिहितो,वाघ बन,नाग बन

मनूला जाळणारी आग बन..या ओळी म्हणजे शब्दअंगारच जणू.भावी पिढ्यांच्या हाती सोपवलेले भीमधनच.

ज्यातुनच उद्याच्या महाक्रांतीचे स्फुल्लिंग चेतणार आहेत,काळ्या मनूला कायमचे गाडले जाणार आहे.

एकूणच मराठी कवितेत दुर्मिळ होत चाललेली अंगारबोली भोयर यांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी वापरली आहे.म राठी

कितीही अभिजनवादी किंवा अभिजात झाल्याचा डांगोरा पिटला जात असला तरी मायमराठी ही आजही आणि उद्याही खऱ्याअर्थाने गरीब,कष्टकरी,शेतकरी,आदिवासी यांच्या वस्त्या आणि पाड्यांवरच जिवंत राहिली आणि राहणार याची ग्वाही देणाराच

'सालं अतीच झालं!' हा कवितासंग्रह आहे.



भरत यादव
yadavbh515@gmail.com
मो. 9890140500

पुस्तकाचे नावः सालं अतीच झालं
कवीः खेमराज भोयर
प्रकाशकः परिस पब्लिकेशन,पुणे
पृष्ठसंख्याः १५२
मूल्यः दोनशे रुपये

# मानव-वन्यजीव संघर्ष अतितीव्र होता कामा नये..!

**महाराष्ट्रात** व्याघ्र पर्यटनासाठी चंद्रपूर जिल्ह्याचे नाव अग्रस्थानी आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील ताडोबा अभयारण्य व्याघ्र पर्यटनासाठी देशात सुप्रसिद्ध असून ताडोबा अभयारण्यात आजपावतो असंख्य लाखो पर्यटक, सिने अभिनेता,सेलिब्रिटींनी वन भटकंती केली आहे.वाघांच्या संख्येत चंद्रपूर जिल्हा प्रथमस्थानी आहे. चंद्रपूर जिल्हा वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक मिळवत असताना मानव वन्यजीव संघर्षात प्रथमस्थानी येत आहे. हे इथे ठळकपणे अधोरेखित करावेसे वाटते. नागपूर वन विभागात पेंच, ताडोबा- अंधारी, नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पार्गत गावांमध्ये वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. मागील पाच वर्षात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १७५ नागरिकांचा थेट वाघाने हल्ला केल्यामुळे बळी गेला. तर चालू २०२५ या वर्षात जानेवारी ते जून या सहा महिन्याच्या काळात तब्बल पंचविस ग्रामस्थांचा नाहक बळी गेला. जिल्ह्यातील वाघाव्दारे मृत्युमुखी पडलेल्या ग्रामस्थांचा मुद्दा विधानसभेतही प्रचंड गाजला आहे. या घटनेनंतर अनेक आंदोलने झालीत.या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना सत्तर हजारांपासून ते पंचवीस लाखांपर्यंत मदत शासनाकडून कुटुंबीयांना मिळत असते. अलीकडेच वाचण्यात आलेल्या वृत्तानुसार गतवर्षी मानव वन्य प्राण्यांच्या संघर्षात बळी पडलेल्या कुटुंबीयांना मदत देताना गतवर्षी २२० कोटी रुपये एवढी रक्कम मोजावी लागली.जी आतापर्यंतची सर्वाधिक होती. राज्यातील वन पर्यटन वाढीसाठी करोडो रुपये खर्च करून नवनवे प्रयोग आखले जात आहे.यात गैर नाही .परंतु गत पाच वर्षांपासून मानव आणि वनपरिक्षेत्रालगतच्या गावातील शेतकऱ्यांचे पशुधन वाघ व बिबट्यांच्या हल्ल्याने पछाडलेले आहे.याशिवाय व्याघ्र हल्ल्या सोबतचं तृणभक्षी प्राण्यांमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान



होते. एकीकडे लहरी हवामान, शेतमालाचे ढासळते उत्पन्न, त्यात शेतमालांची आणि पशुधनांची जीवित हानी अश्या चौफेर दृष्टचक्राने वनपरिक्षेत्रा लगतच्या शिवारातील शेतकऱ्यांना ग्रासून काढले आहे. वन्य प्राण्यांच्या बचावार्थ अनेक गावकरी शेत पिकांच्या बंदोबस्तासाठी तारेचे कुंपण टाकतात. त्यात विद्युत प्रवाह सोडतात. अशांमुळे वन्य प्राण्यांचा प्राण जातो. आज मानव आणि वन्य प्राणी या दोघांचेही संरक्षण करणे गरजेचे आहे.मानव वन्यजीव संघर्षावर अनेक अहवाल प्रतिवर्षी सादर होतात.त्यांच्या शिफारसी वेळीच स्वीकारल्या असत्या तर आज मानव वन्यजीव संघर्षाची तीव्रता सौम्य झाली असती. अलीकडच्या काळात मानव वन्यजीव संघर्षावर कासवगतीचा उपाय म्हणून वनपरिक्षेत्र व परिसरातील गाव शिवारात कृत्रिम बुद्धिमत्तेवर (ए आय )आधारित कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा ते गोंदियातील नवेगांव बांध पर्यंत सुमारे तीन हजार एकशे पन्नास ए आय कॅमेरे जंगलात बसविण्यात येणार असल्याचे सांगितले जाते. एखादा वाघ किंवा बिबट्या गावं शिवारात किंवा खाजगी जागेत दिसेल, तेव्हा कॅमेरे डिटेक्ट करतील आणि तात्काळ अलार्म वाजेल. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी जीवितहानी कमी होण्यास हातभार लागेल असा विश्वास व्यक्त करूया. मानव वन्यजीव संघर्ष केवळ वन वनपरिक्षेत्र सीमेलगतच होत नसून अन्य लघु, मध्यम,नागरी शहरे सुद्धा वाघांच्या हल्ल्याने



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

भयभयीत झाली आहे.राज्यातील अनेक गावात, वाड्यात, वस्त्यांमध्ये बिबट,वाघांचे दर्शन झाल्याचे वृत्त नियमितपणे कानी पडते. अनेकदा पशुधनाचा फडशा पाडतात.ग्रामस्थ गाव शिवारात सायंकाळच्या समयी जाण्यास धजावतात.वनातून तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या मनात भीतीचे सावट असते. वनपरिक्षेत्रा लगत असलेल्या नागरिकांच्या हितासोबतचं अन्य वन्यप्राणी जे नागरी वस्त्यांकडे कूच करीत आहेत,जे वन अधिवास क्षेत्राच्या बाहेर भटकंती करतात अशा वन्यप्राण्यांद्वारा होणारा धोका तेवढाच कायम असतो. मुळात ही गंभीर समस्या मानवाच्या अमर्याद स्वार्थापोटी जंगलांचा ऱ्हास करण्याने झालेली आहे. आज जंगलांचा अधिवास कायम राखून अन्नसाखळी कायम ठेवण्यावर भर दिला पाहिजे. तरच भविष्यातील मानव वन्यजीव संघर्ष हा संपुष्टात येईल. याचेही भान काळाच्या ओघात ठेवणे गरजेचे आहे.

# मला पंख असते तर..

**आजच्या** युगात प्रत्येक शहरे,गाव रहदारीने तुडुंब भरलेली रस्ते आहेत. रस्त्यावर मुंगी सारखे वाहने रेंगाळत असतात. कारण ट्राफिक जॅम या रहदारीने मी फार वैतागून गेलो आहे.दोन तीन तास लागतात रस्ता ओलांडण्यासाठी,काय करावे? कामावर जाण्यास उशीर होतो.वेळेवर नाही पोहचलो तर खाडा पडतो.या रहदारीस (ट्राफिक जॅम) काही उपाय कोणाकडे असेल का?! एखाद्या रुग्णास दवाखान्यात दाखल करणे असो, की काही महत्त्वपूर्ण काम असो, '' ट्राफिक जॅम 'यातून जागोजाग रस्त्याची दूरावस्था, खोदून ठेवलेले रस्ते हा जीवघेणा प्रवास नकोसा झाला आहे. त्यासाठीच मला पंख असते तर..मी असाच एकदा बसस्टॉपवर उभा होतो.बस येण्याची वाट पाहत होतो. पण बसचा काही पत्ताच नाही .आता रोजच्या सारखे कामाला जाण्यास उशीर होणार आणि मालकाची बोलणी खावी लागेल.रोज रोज या रहदारी कोंडी मुळे आणि बसमुळे मला विनाकारण शिक्षा होत असे.कामाचे ठिकाण ही खूप दूर आहे,चालत जाणे ही शक्य नाही, अशा वेळी मनात एकच विचार येत होता ,मला पंख असते तर..मी भुर्रकन उडून कामावर सर्वांच्या आधी गेलो असतो.उशीर झाला नसता व शिक्षा पण झाली नसती.मला पंख असते तर..मी प्रत्येक सुट्टीत किंवा वेळ मिळेल तेव्हाच गावाकडे ,इतर प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या असत्या.त्यामुळे खर्चाचा विषयच उद्भवला नसता.रस्त्यावरील वाहतूक कोंडी ,गाड्यांची गर्दी ,यात्रेसाठी तिकीट रांगेला उभे राहणे याचा कसलाही त्रास झाला नसता.मला पंख असते तर.मनात आले की,भरारी मारावी. मी महाराष्ट्रातील व भारतातील तीर्थक्षेत्र, सुंदर पर्यटन स्थळांना मन मानेल तेव्हा भेटी देऊ शकलो असतो.ना वाहतूक कोंडी, ना रस्त्याची कटकट,ना दरड कोसळण्याची भीती या पासून मुक्त झालो असेन असे वाटते.आकाशातून मुक्त विहार करताना मला आपले घर, शेती वाडी वस्ती,वरून पाहता आले असते.आपले दोस्त खाली काम करत असताना ,खेळ खेळत असताना,मी त्यांच्या डोक्यावरून फेऱ्या घालू शकलो असतो.तेव्हा त्यांनी आनंदाने टाळ्या ञवाजवल्या असत्या. आकाशातून संचार करताना मला स्वार्थी,मतलबी चोर सोडून नवे मित्र मिळतील.पशू पक्षी माझ्याकडे कौतुकाने पाहतील .मी त्यांची भिती दूर करेन. आणि ( ट्राफिक जाम) वाहतूक कोंडी पासून सुटका होईल. पण हे केव्हा शक्य होईल?! मला पंख असते तर.तेवढ्यात माझी बस माझ्यासमोर उभी राहिली आणि मी बस मध्ये चढलो.



सोमनाथ बेलुरे
धाराशिव
९८५००३६६४६

# इतरांचे दोष दाखविणे सोपे

**माणूस** म्हटलं की गुण दोष आलेच.कोणताही माणूस शंभर टक्के परिपूर्ण नसतो.त्यात काही उणिवा, कमतरता असू शकतात.तसेच काही सक्षम बाजूही असू शकतात. म्हणजेच काही चांगले गुण असतात तर काही वाईट गुण असू शकतात. माणसांना इतरांचे दोष दाखविण्यात किंवा त्यावर रसभरीत चर्चा करायला फार आनंद वाटतो.पण ही चर्चा करताना तो हे विसरतो की माझ्यातही दोष असू शकतात. त्याचे काय करायचे ? त्याची चर्चा कोणी करायची ? आपण जसे इतरांचे दोष दाखवितो तसे आपलेही दोष दाखविण्याची इतरांना मुभा किंवा परवानगी असावी.तसेच दुस-याने आपले दोष दाखविल्यानंतर न राबवता,न चिडता ते खुलेपणाने स्वीकारणं जमलं पाहिजे.पण असे होत नाही.माणसं स्वतः चे दोष सहसा मान्य करत नाहीत.मी परिपूर्ण आहे.मी सर्वज्ञ आहे.असाच त्यांचा समज असतो. इतरांनी दाखवलेले दोष त्यांना दिसत नाहीत.त्यामुळे माणूस स्वतः हा मध्ये बदल करत नाही.मी योग्य आहे अशी त्याची भावना बळावते.ते इतरांच्या मतांना किंमत देत नाही.त्याकडे दुर्लक्ष करतो.आपल्याला इतरांचे ऐकून घेण्याची गरज नाही असे त्याला वाटते.आपले दोष दाखविणारा खरा आरसा म्हणजे मित्र होय. मित्राला आपले दोष नक्कीच चांगले माहित असतात.त्याने सांगितलेले आपल्यातील दोष समजून घ्यावेत. शक्य झाले आणि मनाला वाटले तर ते दूर करता येतात का याचा माणसाने नेहमी विचार करावा. एखादा दोष असला म्हणून तो माणूस पूर्ण वाईट ठरत नाही.त्याच्या इतर बाजू निश्चित चांगल्या असतात. इतरांच्या दोषांवर चर्चा करुन आपला वेळ वाया घालविण्यापेक्षा आपल्यातील दोष किंवा उणिवा कमी करण्याविषयी चिंतन मनन केलेले फायदेशीर ठरते.त्यामुळे आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी आणि प्रेरक बनण्यासाठी आपण प्रयत्न करु शकतो.दुस-यांच्या दोषांवर चर्चा करत राहणं म्हणजे आपल्यातील नकारात्मकता विकसित करणं होय.यामुळे आपले मन सतत नकारात्मक शोधायला लागतं.माणसातील चांगलं काही दिसूनही स्वीकारणं जमत नाही. कारण मनाला सतत दोष पाहण्याची सवय लागलेली असते. अशी सवय घातक असते.आपले नुकसान करते.यासाठी आपल्या विचारांना सकारात्मक दिशा दिली पाहिजे.दुस-याचे दोष पाहण्यापेक्षा माझ्यातील दोष दूर करण्यासाठी माझ्यात काय परिवर्तन करता येईल याचाच नेहमी विचार करावा. आणि त्याप्रमाणे आपली कृती असावी.

लक्ष्मण जगताप
लेखक शिक्षक आहेत.
बारामती

# धाराशिव तहसील कार्यालय परिसरात वृक्षारोपण करून हरित धाराशिव उपक्रमात सहभाग

आरंभ मराठी | धाराशिव

हरित धाराशिव अभियाना अंतर्गत एकाच दिवसात जिल्ह्यात १५ लक्ष वृक्ष लागवड करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला होता. या अभियानाला जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी प्रतिसाद देत यामध्ये सहभाग घेतला. यामध्ये धाराशिव तहसील कार्यालयाच्या आवारात देखील वृक्षारोपण करण्यात आले.धाराशिव तालुक्याकरिता तालुकास्तरावर तालुका नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला होता. त्या कक्षाचे प्रमुख नायब तहसीलदार स्वामी यांच्या




मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले. तहसील कार्यालय परिसरात नियंत्रण कक्षाचे घोंगडे, सहाय्यक प्रशासनाधिकारी सोमानी व बारबोले, कनिष्ठ प्रशासन अधिकारी कुलकर्णी, विस्ताराधिकारी आरोग्य मल्लिनाथ जमादार, ग्रामपंचायत अधिकारी वीरभद्र स्वामी, राजेश भवाळ, महसूल सहायक शिंदे, लिपिक शेख, संगणक परिचालक सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत यावेळी वृक्षारोपण करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

रविवार,दि. 20 जुलै 2025

# एक पेड माँ के नाम उपक्रमातून मुरूम नगर परिषदेची हरित क्रांती

## जलशुद्धीकरण केंद्रात राज्यातील १२ किल्ल्यांच्या प्रेरणेने वृक्षारोपण ब्लॉक

**आरंभ मराठी | मुरुम**

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या १५ लक्ष वृक्षारोपण संकल्प उपक्रमात मुरुम नगर परिषदेकडून शनिवारी (ता.१९ जुलै) रोजी एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे. ''एक पेड मा के नाम'' या भावनिक संकल्पनेला अनुसरून, मुरुम शहरातील जलशुद्धीकरण केंद्र परिसरात राज्याच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक ठरलेल्या १२ किल्ल्यांच्या नावाने वृक्षारोपण ब्लॉक तयार करण्यात आले आहेत. या उपक्रमात प्रत्येक ब्लॉकच्या देखरेखीसाठी एक अधिकारी नेमण्यात आले असून, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, सफाई कामगार, तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सुमारे १०० हून अधिक नागरिक या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेषतः, प्रत्येक झाडावर बारकोड लावण्यात आले असून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद व्हावी यासाठी तसेच प्रत्येक झाडाच्या देखभालीचा ठोस नोंदवही तयार राहावा, यासाठी ही पद्धत अवलंबण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक नगरपरिषदेसाठी नायब तहसीलदार दर्जाचे नोडल अधिकारी नेमण्यात आले असून, मुरुम नगर परिषदेच्या नोडल ऑफिसर म्हणून नायब तहसीलदार ज्योती चव्हाण यांनी जबाबदारी सांभाळली आहे.



### निसर्गाच्या संवर्धनासाठी उपयुक्त उपक्रम

झाडं फक्त लावण्यासाठी नाहीत, तर आईच्या स्मृतीस अर्पण करत जगवण्यासाठी आहेत. ही संकल्पना मुरूमच्या मनामनात रुजते आहे, हेच या उपक्रमाचे यश. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम फायदेशीर ठरणारा आहे.

**ज्योती चव्हाण नोडल ऑफिसर**
इन्चार्ज नगर परिषद मुरुम शहर




### पर्यावरणीय समतोल सुधारेल

मुरुम नगर परिषद संपूर्ण मनोभावे या उपक्रमात सहभागी झाली आहे. भविष्यात या झाडांमुळे मुरुम शहराचा पर्यावरणीय समतोल सुधारेल, आणि हिरवाई अधिक बहरेल.

**सचिन भुजबळ मुख्याधिकारी**
नगरपरिषद मुरुम शहर

याप्रसंगी मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनीही संपूर्ण पथकासह उपस्थित राहून मार्गदर्शन केले. ''एक पेड मा के नाम'' या संकल्पनेतून फक्त वृक्षारोपण नाही, तर मातृत्व, परंपरा आणि पर्यावरण रक्षणाचे एकत्रित मूल्य जपण्याचा मानस या उपक्रमामागे आहे.

# विधानभवनामध्ये राडा,वंचित बहुजन आघाडीकडून कारवाईची मागणी



**आरंभ मराठी | परंडा**

विधानभवनामध्ये लोकशाहीला काळीमा फासणारी निंदनीय घटना घडली असून, सत्ताधारी आणि विरोधी आमदारांच्या समर्थकांमध्ये झालेल्या हाणामारीच्या घटनेसंदर्भात कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशा मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसीलदारांमार्फत सरकारला देण्यात आले. निवदेनात म्हटले आहे की, राज्यातील जनतेच्या विविध प्रश्नांसंदर्भात अधिवेशन सुरू असताना गुरुवारी सत्ताधारी आणि विरोधी आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारीची घटना घडली. विधानभवनाच्या जागेत आमदार समर्थक कार्यकर्ते यांच्यामध्ये घडलेला हा प्रकार अतिशय निंदनीय असून लोकशाहीची विटंबना करणारा आहे. संविधानाची मूल्ये विसरून काही लोकप्रतिनिधींचे वर्तन देखील या घटनेस जबाबदार आहे. सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांवर विधानभवनामध्ये चर्चा करण्यासाठी देखील वेळ कमी पडतो. पण अशा निंदनीय घटनांमुळे विधिमंडळाचा अर्थ वेळ वाया जातो. अशा घटना विधिमंडळात फुले-शाहू-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये घडणे दुर्दैवी आहे. त्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधींसह सर्वांवर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात यावेत, जेणेकरून अशा प्रकारचा निंदनीय प्रकार यापुढे घडणार नाही. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, जिल्हा उपाध्यक्ष मोहन बनसोडे, संतोष हिवरे,रवींद्र शिंदे, जानकीराम कळंबकर,राहुल पवार,रुपाली राहुल पवार, उषाबाई ऐवर्डी पवार आदी उपस्थति होते.

# उमरगा शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन

**आरंभ मराठी | उमरगा**



सकल मातंग समाज उमरगा तालुक्याच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, उमरगा येथे प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम शुक्रवारी (दि.१८) घेण्यात आला. यावेळी प्रतिमेचे पूजन समाजसेवक बालाजीभाऊ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समाजसेवक राजाभाऊ शिंदे, समाजसेवक विजय भाऊ तोडकर, मारुती मामा नरसिंगे, भगवान वाघमारे, कृष्णा पात्रे, प्रा. राजेंद्र पात्रे, ॲड. सचिन दुनगे, विशाल कांबळे, शंकर कांबळे, अभिषेक सुरवसे, कमलाकर गवळी, श्रीकांत क्षिरसागर, अजय कांबळे, सुजेल कांबळे, आदित्य सुरवसे, ऋषिकेश सुरवसे यावेळी उमरगा तालुक्यातील सर्व सकल मातंग समाज बांधवांची उपस्थिती होती. उमरगा तालुक्यात विविध शासकीय नियम शासकीय कार्यालय व शाळा महाविद्यालय व विविध पक्ष संघटना कार्यालय मध्ये स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

# वंचित बहुजन आघाडीची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

## परंड्यातील तिघांची वर्णी

**आरंभ मराठी | परंडा**

वचित बहुजन आघाडीच्या धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची घोषणा पक्षाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव किसन चव्हाण यांनी बुधवारी (दि.१६) केली. या कार्यकारिणीत धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी ॲड.प्रणित डिकले तर जिल्हा महासचिव पदी म्हणून धनंजय सोनटक्के यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. परंड्यातून मोहन बनसोडे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, तर तानाजी जाधव यांची जिल्हा संघटक म्हणून वर्णी लागली आहे. धाराशिव जिल्हा वंचित बहुजन आघाडीची २३ सदस्यीय जम्बो कार्यकारिणी प्रदेश महासचिव किसन चव्हाण यांनी नुकतीच जाहीर केली. त्यांनी सर्व तालुक्यांना या कार्यकारिणीत स्थान देऊन समतोल राखण्याचा प्रयत्न केला. सर्व समाज, गट-तट डोळ्यांपुढे ठेवून ही कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. या निवडी निमित मराठवाडा उपाध्यक्ष प्रविण रणबागुल धाराशिव जिल्हा निरिक्षक अविनाश भोसीकर, राज्य प्रवक्ते ॲड.अरुण जाधव, प्रा. विष्णु जाधव फुले आंबेडकर विद्वत महासभा राज्य समन्वयक प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे, वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अनुराधा लोखंडे यांना शहराध्यक्ष किरण बनसोडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या निवडीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.

# खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर येथे आरोग्य शिबिर

**आरंभ मराठी | तुळजापूर**



खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर शहरात शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने भव्य आरोग्य शिबिर घेण्यात आले. यामध्ये २३५ लोकांनी सहभाग नोंदवला. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, महिला आघाडी जिल्हा प्रमुख शामलताई वडणे, शिवसेना जिल्हा समन्वयक श्याम पवार, शिवसेना शहरप्रमुख राहुल खपले, शिवसेना शहर संघटक अर्जुन साळुंके, नरेश पेंदे, उत्तम अमृतराव, रणजीत इंगळे, अनमोल साळुंखे, आनंद जगताप, नवनाथ (आप्पा) जगताप, विकास भोसले, राज खपले, शिवराज शेटे, क्रांती वाकळे, गोरक्षनाथ पवार, नागनाथ भाऊ भांजी, अमोल कुतवळ , अजय साळुंके, बालाजी तट आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.जाधव, डॉ. नीतू मलबा, डॉ. श्रीमती जगदाळे, डी. एस, डॉ .के बी गुंड, डॉ. कामठाणे डी एम, डॉ. वारुळे, डॉ. गारगिलवार अंकिता, डॉ. माने, डॉ. तांबोळी वसीम यांनी सहकार्य केले. तसेच यावेळी आजी माजी पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेशीम शेतीचे क्षेत्र वाढून शेतकऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी उमरगा येथे एकदिवसीय कार्यशाळेला प्रतिसाद

**आरंभ मराठी | उमरगा**

जिल्ह्यात रेशीम शेतीचे क्षेत्र वाढून रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उमरगा येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांनी पारंपारिक पीक पद्धतीत बदल केला पाहिजे. रेशीम शेतीसाठी पोषक वातावरण असल्याने, कमी क्षेत्रात अधिक उत्पादन देणाऱ्या या शेतीसाठी शासकिय अनुदानाचा लाभ घेत शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाबरोबरच उद्योजक व्हावे असे आवाहन भाजपाचे युवा नेते, कार्यशाळेचे आयोजक शरण पाटील यांनी केले. जिल्हा रेशीम कार्यालय धाराशिव व शरण पाटील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. १८) शहरातील शांताई मंगल कार्यालयात आयोजित रेशीम शेती व तुती लागवड कार्यशाळेत शरण पाटील बोलत होते. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार अध्यक्षस्थानी होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापूरे, भाजपाचे जेष्ठ नेते रामकृष्णपंत खरोसेकर, उमरगा कृषी बाजार समितीचे सभापती बसवराज कस्तुरे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. या वेळी मैनाक घोष यांनी रेशीम शेती शेतकऱ्यांसाठी वरदान असल्याचे सांगून शासकिय लाभ घेत तांत्रिकदृष्टीने ही शेती यशस्वी करण्याचे आवाहन केले. जिल्हा रेशीम विकास अधिकारी आरती वाकुरे म्हणाल्या की, शेतकऱ्यांना प्रशिक्षणाच्या माध्यमातुन माहिती दिली जात असून जिल्ह्यात १४ चॉकी सेंटर सुरू झाले आहेत. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी रेशीम शेतीची माहिती सांगताना, धाराशिव



जिल्हा रेशीम हॅब करण्याचा प्रयत्न सुरू आहे. उमरगा-लोहारा तालुक्यातील पाचशे शेतकऱ्यांनी तुतीची लागवड केली तर त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी रेशीम कोष खरेदीचे केंद्र उमरग्यात मंजूर करू, सोबतच रेशीम शील्कच्या साड्या निर्मितीचे केंद्रही सुरु करता येईल, यासाठी शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे असे आवाहन केले. यावेळी प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांनी प्रास्तविक, प्रा.डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी सुत्रसंचलन केले तर रफिक तांबोळी यांनी आभार मानले.

# येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात २५० वृक्षारोपण

**आरंभ मराठी | येणेगूर**

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथे शनिवारी (दि.१९) कॅप्टन जोशी स्मारक प्रशालेत हरित धाराशिव अभियान व एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत पालक, लोकप्रतिनिधी व प्रशालेतील मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या हस्ते २५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. श्री परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, ग्रामपंचायत सदस्या लक्ष्मीताई पाटील, आशाबानू मकानदार, शिक्षण प्रेमी व सामाजिक कार्यकर्त्या चंदाराणी घोरपडे, पालक प्रतिनिधी वर्षाराणी घोरपडे, खैरूनिसा शेख, आशाताई भुसार, पुष्पाताई घोरपडे, समीना खजुरे, सुजाता काटगावे, शहाणाज पठाण, बिस्मिल्ला शेख,मदिना भालके,अण्णाप्पा जमादार, बसाय्या स्वामी, मोतीसिंग राजपूत, हाजीमलंग फरकांडे, साई बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक शंकर हुळमजगे, आनंदराज बिराजदार, सौरभ उटगे, महेश खंडाळकर, चंद्रकांत बिराजदार सर्व शिक्षक शिक्षकेतरकर्मचारीआणिविद्यार्थीउपस्थितहोते.




# शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी बाधित शेतकऱ्यांचे पालकमंत्री सरनाईक यांना निवेदन

**आरंभ मराठी | धाराशिव**

नागपूर ते गोवा प्रस्तावित असणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीचे निवेदन धाराशिव जिल्ह्यातील १९ गावातील बाधित शेतकऱ्यांनी शनिवारी (दि.१९) पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना दिले. हरित धाराशिव उपक्रमासाठी धाराशिव दौऱ्यावर आलेल्या पालकमंत्री सरनाईक यांची शेतकऱ्यांनी भेट घेऊन निवेदनाद्वारे ही मागणी केली. निवेदनात असे म्हंटले आहे की, नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्ग धाराशिव जिल्ह्यातील १९ गावांमधून प्रस्तावित आहे. जवळपास दीड ते दोन वर्षांपासून नागपूर गोवा शक्तीपीठ महामार्गाला बाधित शेतकऱ्यांचा संपूर्ण विरोध आहे. हा विरोध वेळोवेळी लोकशाही मार्गाने आंदोलन करून केलेला आहे. बाधित होणाऱ्या १९ गावांनी ग्रामसभेचे ठराव घेऊनही शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी केली आहे. धाराशिव जिल्ह्यात उपजीविकेचे एकमेव साधन शेती हेच आहे. हा महामार्ग संपूर्ण बागायत जमिनीमधून जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी पूर्णपणे उध्वस्त होणार आहे. वेळोवेळी धरणे आंदोलन करून लोकशाही मार्गाने या महामार्गाला बाधित शेतकऱ्यांनी आतापर्यंत विरोध



केलेला आहे. त्यामुळे शक्तीपीठ महामार्ग कायमचा रद्द करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावर पालकमंत्री सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

# स्वच्छतेचा संदेश घेऊन साईनाथ महाराज वसमतकर तुळजापुरात

## श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात आपल्या अनुयायांसह केली स्वच्छता

**आरंभ मराठी | तुळजापूर**

महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत राष्ट्रसंत द. भ. पा. साईनाथ महाराज वसमतकर यांनी शुक्रवारी (दि.१८) शेकडो अनुयायांसह श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून समाजात स्वच्छतेचा संदेश दिला. महाराष्ट्र शासनाने त्यांची स्वच्छता दूत म्हणून निवड केली असून, राज्यभर ते सातत्याने जनजागृती मोहीम राबवित आहेत. स्वतःचा आश्रम नांदेड जिल्ह्यातील माहूरगड येथे असलेले साईनाथ महाराज हे गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन गेल्या काही वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांनी अंधश्रद्धा व कर्मकांड यांचा त्याग करून समाजात स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करण्याचा वसा घेतला आहे. शुक्रवारी सकाळी त्यांनी तुळजापुरातील श्री तुळजाभवानी मंदिर



परिसरात आपल्या शेकडो अनुयायांसह सफाई मोहिम राबवली. परिसरातील कचरा स्वतः उचलून कचरा कुंडीत टाकत त्यांनी उपस्थितांना स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. ''माणसामध्येच देव आहे, आणि मी माझ्या कार्यामध्ये देव शोधतो,'' असे ते यावेळी म्हणाले. स्वच्छता मोहिमेनंतर साईनाथ महाराजांनी श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थानच्या वतीने त्यांना देवीची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी धार्मिक व्यवस्थापक रामेश्वर वाले, सहायक जनसंपर्क अधिकारी अभिजित तेरखेडकर, प्रशांत जाधव, स्वच्छता निरीक्षक मनोज घोडगे, सहायक स्वच्छता निरीक्षक अक्षय साळुंखे, सुमित रघुजीवर, पवन पांडे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी संख्येने उपस्थित होते.

# ६२० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेच्या स्वच्छतेची धुरा एका दिव्यांग परिचरावर

## शिराढोणच्या पीएमश्री आदर्श जिल्हा परिषद प्रशालेकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

### दिव्यांग परिचराला कामे करण्यास मर्यादा असल्यामुळे आणखी दोन पदे नियुक्त करण्याची मागणी

अमोलसिंह चंदेल | आरंभ मराठी

शिराढोण – कळंब तालूक्यातील शिराढोण येथील पीएमश्री आदर्श जिल्हा परीषद प्रशालेत तीन परीचरांची पदे मान्य असतानाही सध्या केवळ एका अपंग असलेल्या परीचरावर एवढया मोठया शाळेचीस्वच्छतेची जबाबदारी आहे. या शाळेच्या गुणवत्तेचा चढता आलेख मागील दोन वर्षापासून अबाधीत आहे. शाळेतील सर्व शिक्षकांच्या मदतीने या शाळेत ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण मिळत आहे.याचा परिणाम नवोदय, शिष्यवृत्ती सारख्या स्पर्धा परीक्षेमध्ये सर्वसामान्य कूटूंबातील विद्यार्थी चमकू लागले आहेत. मात्र शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे एवढ्या मोठया शाळेसाठी तीन परीचरांची पदे मान्य असतानाही एकाच परीचरावर या शाळेचा स्वच्छतेचा गाढा हाकला जात आहे.

शिराढोण येथे ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परीषद प्रशाला अस्तीत्वात आहे. या शाळेच्या प्रांगणात वेगवेगळया एकूण ८ ईमारती आहेत. त्यासोबच मुला मूलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह, ऑफीस समोरील वरंडा, शाळेत विविध वृक्ष आहेत त्यांचे संगोपन अशा मोठया शाळेसाठी सध्या केवळ एक परीचर कार्यरत आहते. ते देखील दिव्यांग असल्याने शाळेत स्वच्छतेच्या बाबतीत गैरसोय निम र्ण होत आहे. या शाळेत २५ वर्ग खोल्या आहेत व ६२० विद्यार्थी, २७ शिक्षक यांची रेलचेल आहे. त्यामूळे या शाळेत एकूण ३ परीचर असणे गरचेचे आहे. या शाळेत मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जलशुध्दीकरण यंत्र, प्रशस्त मैदान, निसर्गरम्य वातावरण, सिसिटीव्ही अशा सर्व सोईंनी युक्त असलेल्या या शाळेच्या स्वच्छतेची जवाबादरी ही केवळ एका परीचरावर अवलंबून आहे. त्यामूळे शिक्षण विभगाने शाळेचे व्यापक स्वरुप, गुणवत्ता, विद्यार्थी संख्या याचा विचार करुन या शाळेसाठी आणखी दोन परीचरांची नियूक्ती करणे अत्यंत गरजेचे आहे.




### आणखी दोन परिचरांची मागणी

शाळेची मोठी ईमारत व विद्यार्थी संख्या लक्षात घेता या शाळेत एकूण तीन परीचर कार्यरत असणे गरजेचे आहे. याबाबत माझ्या वतीने मी जिल्हा परीषदेला सर्व माहिती पुरवलेली आहे.तसेच आणखी दोन परीचर या शाळेत नियूक्त करण्याची विनंती केलेली आहे.

**सुनिल अहिरे,**
मुख्याध्यापक, पीएमश्री जि.प.प्रशाला, शिराढोण.



### २७ मे रोजी शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने निवेदन

शिराढोण येथील पिएमश्री आदर्श जिल्हा परीषद प्रशालेत कार्यरत दोन पैकी एका परीचराची बदली झाल्याचे समजताच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोलसिंह चंदेल व सर्व सदस्यांनी दिनांक २७ मे २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाव्दारे शाळेत एकूण २५ वर्गखोल्या, ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या, वेगवेगळया ८ ईमारती, २७ शिक्षकांचा स्टाफ असल्याची माहिती दिली होती. तसेच या शाळेत एकूण ३ परीचर आवश्यक असल्याची विनंती करण्यात आली होती. मात्र या निवेदनावर अद्याप पर्यंत तरी कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून येत आहे.

# वाशी नगरपंचायतच्या वतीने हरित धाराशिव अभियानातून शहरात वृक्षारोपण

## कर्मवीर जगदाळे महाविद्यालयाचा सहभाग



आरंभ मराठी | वाशी

जिल्हा प्रशासनाच्या वतीने हरित धाराशिव पर्यावरण पूरक अभियान जिल्हाभरात राबविण्यात आले. जिल्हाभरात एकाच दिवशी १५ लक्ष वृक्षारोपण करण्याचा संकल्प प्रशासनाने केला होता. त्यानुषंगाने वाशी येथे शनिवार (दि.१९) रोजी नगर पंचायतच्या वतीने नवीन पाण्याच्या टाकीजवळ सहा हजार रोपे लावण्यात आली. या हरित धाराशिव अभियानात येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयानेही सहभाग घेत परिसरात वृक्षरोपण केले. कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना आणि ग्रीनक्लब सदस्य अशा एकूण १८० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. यावेळी महाद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी अशा एकूण ४० जणांनी वृक्षारोपण करण्यासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शहरातील शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षकही यावेळी उपस्थित होते. वाशी नगरपंचतच्या नगराध्यक्षा विजयाताई गायकवाड यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्याधिकारी सुरेखा कांबळे, नगरपंचायतचे गटनेते नागनाथ नाईकवाडी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक कदम, नगरसेविका वंदना कवडे, नगरसेवक संतोष गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व वृक्ष संवर्धनासाठी दत्तात्रय साठे यांनी शपथ दिली. तर नगरपंचायत कार्यलयाचे अधीक्षक सयाजी माने यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरपंचायत कर्मचारी यांनी कष्ट घेतले.

# शहरातील १४० कोटींच्या रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून कचरा डेपोचे स्थलांतर करा

## महाविकास आघाडीचे पालकमंत्र्यांना निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या १४० कोटींच्या मंजूर कामांना तात्काळ सुरुवात करावी, तसेच शहरालगत असलेला कचरा डेपो अन्यत्र हलवावा, या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आम दार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१९) पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांना निवेदन दिले. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी नगरोत्थान महाअभियानांतर्गत रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती. नियमांनुसार तीन महिन्यात कामांना सुरुवात होणे अपेक्षित असताना, दीड वर्ष उलटूनही कामे सुरू झालेली नाहीत. त्यामुळे खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, नागरिकांचे हाल सुरूच आहेत. ३० एप्रिल रोजी पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणस्थळी भेट देऊन ''रस्त्यांची कामे लवकरच सुरू केली जातील व कचरा



डेपो अन्यत्र हलवण्यात येईल'' असे जाहीर आश्वासन दिले होते. मात्र, अडीच महिने उलटूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याने, दिलेल्या आश्वासनाचा विसर मंत्री महोदयांना पडला असल्याची टीका महाविकास आघाडीकडून करण्यात आली. त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करत पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच शहरालगत असलेला कचरा डेपो दुर्गंधी आणि धुरामुळे आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. श्वसनाचे विकार आणि अस्वच्छतेमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे कचरा डेपो इतरत्र हलवून त्यावर प्रक्रिया करण्याची मागणी म हाविकास आघाडीने पुन्हा एकदा जोरदारपणे मांडली. या शिष्टमंडळात शिवसेना (उबाठा), काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी सहभागी होते.

# हरित धाराशिव अभियानात सांगवी मार्डी येथे ६००० झाडांचे वृक्षारोपण



आरंभ मराठी | तुळजापूर

जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या हरित धाराशिव अभियानांतर्गत तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी येथे सहा हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. गावातील नागोबा मंदिर परिसरात ही सहा हजार झाडे लावण्यात आली असून, ह्या झाडाची देखभालही करण्यात येणार आहे. यावेळी तुळजापूर तालुक्याचे कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पिंपळे, सोलापूर येथील प्रसिद्ध डॉक्टर नवनीत तोष्णीवाल, डॉ. संजय तोष्णीवाल यांच्यासह गावचे सरपंच युवराज बागल, पोलीस पाटील संजय बागल, ग्रामविकास अधिकारी प्रदीप लाटकर, अंगणवाडी कार्यकर्ती चंदाराणी गायकवाड यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते.

# जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची पंगत



धाराशिव शहरातील राजीव गांधी नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परसबागेतील केळीच्या पानांवर विद्यार्थ्यांनी भोजनाचा आनंद घेतला.

# हरित धाराशिव अभियानाला भूम शहरासह तालुक्यातील नागरिकांचा प्रतिसाद

आरंभ मराठी | भूम

धाराशिव जिल्हा प्रशासनाने लोकसहभागातून जिल्ह्यात १५ लक्ष झाडे लावण्याचा संकल्प केला असल्याने हरित धाराशिव अभियान अंतर्गत भूम शहरासह गाव, वाडी, वस्तीवर नागरिकांनी मोठया प्रमाणात आपला सहभाग नोंदवला. वृक्ष लागवड अभियानामध्ये प्रशासनाच्या वतीने मोठी चळवळ उभारली. प्रत्येक कार्यालयाच्या प्रमुखांनी गावपातळीवर अभियान राबवण्याबाबत सूचना दिल्या असल्याने वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. १९ जुलै रोजी सकाळपासूनच तालुक्यात झाडे लावण्यासाठी लगबग सुरू होती. भूम तालुक्यात वीस प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. भूम शहरात नगरपरिषद, उपविभागीय कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग, आरोग्य विभाग, शैक्षणिक विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, गटविकास अधिकारी कार्यालय सर्व ग्रामपंचायत अंगणवाडीचे कर्मचारी व गावागावातील लोकप्रतिनिधी व कर्मचारी, शालेय विद्यार्थी यांच्या उपस्थितीत लाखो वृक्षांची लागवड करण्यात आली.






# कसगी येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयात ५५१ वृक्षांची लागवड

आरंभ मराठी | उमरगा

जल, जंगल, जमीन, संवर्धनासाठी ओसाड वाटणाऱ्या धाराशिव जिल्ह्यात १५ लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या उत्तम नियोजनाने आणि जिल्ह्यातील सर्व शासकीय खात्याचे कर्मचारी जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योग चालवणारे व्यापारी स्वयंसेवी संस्था, बचत गट शाळा सर्वांना एकत्रित घेऊन, दिनांक १९ जुलै २०२५ रोजी १५ लक्ष वृक्ष लागवड करून जागतिक रेकॉर्ड बनवण्याचे आणि धाराशिव जिल्ह्याला हरित धाराशिव तयार करण्यासाठी उत्तम नियोजन केले.यावेळी धाराशिव जिल्ह्यातील कृषी उद्योगावर आधारित धाराशिव जिल्हा फर्टीलायझर्स सीड्स आणि पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशनचे स्वतंत्र बैठक घेऊन धाराशिव जिल्हा अध्यक्ष विठ्ठलराव बदोले आणि धाराशिव जिल्ह्यातील सर्व खत बियाणे आणि औषधे विक्रेते त्यांची स्वतंत्र बैठक घेऊन हरित धाराशिव महाअभियानात सहभागी होण्याची विनंती केली होती. हे अभियान यशस्वी करण्यासाठी उमरगा तालुक्यातील मौजे कसगी येथे श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या परिसरात वड, पिंपळ,औदुंबर, चिंच, साग, कडुलिंब, मिली डुबिया, तुती अशा बहुवार्षिक ५५१ वृक्षांची लागवड विठ्ठलराव बदोले यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी लक्ष्म



ीचंद्र कृषी सेवा केंद्र चे प्रोप्रायटर विनय बदोले, गुरुदत्त शेती विकास केंद्राचे अम रसिंग ठाकूर, संस्थेचे संचालक राम मोरे, भीमाशंकर बोरुटे या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यालयात एक विद्यार्थी एक झाड ही उद्दिष्ट ठेवून मुख्याध्यापक माशाळे यांनी ५५१ झाडे लावून महाअभियान यशस्वी केले. यावेळी विद्यालयातील सर्व कर्मचारी बांधव व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्होतरवाडी,भिकारसारोळा येथे ६६०० वृक्षारोपण

## ग्रामपातळीवरील अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधिंचा सहभाग

आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील म्होतरवाडी, भिकार सारोळा येथे जिल्हा प्रशासन आणि लोकसहभागातून हरित धाराशिव अभियान ''एक पेड मा के नाम'' संकल्प वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.१९) करण्यात आले होते. यावेळी म्होतरवाडी व भिकार सारोळा येथे प्रत्येकी ३३०० झाडे लावण्यात आली. म्होतरवाडी येथे सरपंच राम सुतार, उपसरपंच महेश चव्हाण, राजाभाऊ पाडुळे, सोसायटी चेअरमन प्रकाश पाडुळे, ग्रामसेवक एल. पी. गरड, जागजी ग्रामसेवक श्री. वाघे, टाकळी ढोकी तलाठी शीतल रसाळ, सुंभा तलाठी पवन पुरी, पोलीस पाटील सुभाष कदम पाटील, योगेश कदम, महसूल सेवक अनिता डिगे, सिआरपी गीता चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठया संख्येने सहभागी झाले होते. भिकार सारोळा येथे वृक्ष लागवडीमध्ये सरपंच सतीश शिंदे, उपसरपंच आण्णासाहेब तनमोर ग्रा.प. ऑपरेटर, आण्णा तनमोर ग्रा .पं. रोजगार सहाय्यक गोपाळ झुंजकर, पाणीपुरवठा कर्मचारी मजनु शेख, पोलिस पाटील सुनिता जगदे, युवा कार्य प्रशिक्षणार्थी तात्यासाहेब फोलाने, प्रविण तनमोर तसेच लक्ष्मण पुंड, राजेंद मेदने, औदुंबर पाटील, पुष्पशेन मेटे, सुरेश पाडुळे, भीमाशंकर तनमोर मुरहरी पाटील, गावातील संत निरंकारी मंडळ, गावातील सर्व बचत गट महिला व पुरुष तसेच जि. प.शाळेतील सर्व विद्यार्थी व पळसप शिक्षक मंडळी उपस्थित होते. तसेच वृक्षारोपणाचा कार्यक्रम भिकार सारोळा येथील ग्रामपंचायत अधिकारी एम. पी. अहिरे, मंडळ अधिकारी अनिल आहिरे, जागजी तलाठी चक्रधर माळी, तालुका कृषी अधिकारी प्रवीण चोपडे, मुख्याध्यापक कदम सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती भाग्यश्री गवळी व श्रीमती रोहिणी जाधव आणि ग्राम महसूल अधिकारी जयचंद




लाकाळ, आशा कार्यकर्ता सुवर्णा तनमोर, उमा सरपाळे, बचत गट महिला सीआर पी जनाबाई पुंड, स्वस्त धान्य दुकानदार येसाजी पाटील यांनी श्रमदान करून ग्राम स्था समवेत वृक्षारोपण यशस्वीरीत्या पार पाडले. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी नेम लेले नोडल अधिकारी प्रवीण चोपडे तालुका कृषी अधिकारी धाराशिव यांनी देखील वेळोवेळी मार्गदर्शन करून वृक्षारोपणाचा कार्यक्रम पूर्ण करण्यास मदत केली.

# नळदुर्ग येथे हरित धाराशिव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## एक हेक्टरवर ३० हजार वृक्षांची एकाच दिवसात लागवड

आरंभ मराठी | नळदुर्ग

धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतुन साकरण्यात येत असलेल्या ''हरीत धाराशिव'' अभियानांतर्गत १९ जुलै रोजी नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने वसंतनगर जवळील नगरपालिकेच्या सर्वे नं. २३६/७ मधील १०० गुंठे जमिनीवर एकाच दिवसात विक्रमी ३० हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार व त्यांच्या सहकाऱ्यांच्या अथक परीश्रमातुन ही विक्रमी वृक्ष लागवड करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन निर्माण झालेले ''एक पेड, माँ के नाम'' हे अभियान संपुर्ण देशात १९ जुलै रोजी राबविण्यात आले. याच संकल्पनेच्या माध्यमातुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात १० कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला आहे. याच पार्श्वभुमीवर धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी धाराशिव जिल्ह्यात ''हरीत धाराशिव'' ही संकल्पना राबविण्याचा निर्णय घेऊन ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात यावी यासाठी गेल्या दोन महिन्यांपासुन सातत्याने प्रयत्न केले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची हरीत धाराशिव ही संकल्पना यशस्वी व्हावी यासाठी नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी १९ जुलै रोजी एकाच दिवशी नगरपालिकेच्या वतीने शहरात ३० हजार वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला होता. हा संकल्प त्यांनी १९ जुलै रोजी ३० हजार वृक्षाची लागवड करून पुर्ण केला. यासाठी मुख्याधिकारी कुंभार यांनी गेल्या एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासुन मेहनत घेतली. १९ जुलै रोजी वसंतनगर जवळील सर्वे नं. २३६/७ मधील १०० गुंठे



जमिनीवर नगरपालिकेच्या वतीने ३० हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये कॅनोपी प्रजाती, वृक्ष प्रजाती, उपवृक्ष प्रजाती व झुडुप औषधी प्रजाती या वृक्षांचा समावेश आहे. या प्रजातीतील वड, पिंपळ, आंबा, साग, चिंच, शिसु, जांभळ, मोगरा, महारुखी, पळस, उंबर, खैर, करंज, कडुनिंब, आवळा, मोहराणी, कवठ, कदंब, अर्जुन व शिवण यासह ४३ जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रत्येक वृक्ष लागवडीच्या प्लॉटला राज्यातील विविध अभयारण्यांची नावे देण्यात आली आहेत. या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात नगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी तसेच मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील १५० बचत गटातील महिला, शैक्षणिक संस्था, नळदुर्ग शहर पत्रकार संघ, विविध बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. शहरातील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुल, नॅशनल मराठी शाळा, सय्यद अब्दुल्ला शहा उर्दु मेमोरीयल शाळा या शाळांचे विद्यार्थी व शिक्षकही या वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभागी झाले होते.